Review of Research
International Online Multidisciplinary Journal

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 5 | Feb - 2016



# दुर्गाबाई भागवत यांचे व्यक्तिमत्व आणि वाड्.मय संपदा : एक परिचय

प्राची अर्जुन शेकटकर

## प्रास्ताविक

दुर्गाबाई भागवत 'एक बंडखोर विदुषी' म्हणून मराठी साहित्यामध्ये नावाजलेलं बहुआयामी व्यक्मित्त्व, मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, बुध्दिचरित्र आणि धर्माच्या विशेष जाणकार, अतिशय परखड बाण्याच्या संशोधिका, आदिवासी जीवनाच्या व्यासंगी भाष्यकार, अत्युच्च श्रेणीच्या ललित लेखिका, त्याचबरोबर संस्कृत, पाली, धर्ममागधी, बंगाली, जर्मन, इंग्रजी भाषा जाणणारं बहुचर्चित व्यक्तिमत्त्व त्यांच्या या अभ्यासू वृत्तीबरोबरच 1975 मध्ये कराड येथे भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरुन आणीबाणीविरोधी आवाज उठविणारी कृतिशील लेखिका म्हणून दुर्गाबाई भागवत या आपणा सर्वांना परिचित आहेत.

या लेखिकेचा 10 फेब्रुवारी 1910 हा जन्मदिवस, त्यानिमित्ताने दुर्गाबाईंच्या प्रकाशित मराठी साहित्याचा घेतलेला हा आढावा.

स्थूलपणे विचार करता दुर्गाबाईंच्या साहित्याचे अभ्यासपूर्ण आणि ललित लेखन असे दोन भाग पडतात. सुरुवातीचे बाईंचे लेखन हे इंग्रजी भाषेतून आणि अभ्यासपूर्ण अशा प्रकारचे आहे. त्यामध्ये समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र, लोकसाहित्याशास्त्र या विषयांवरील लेखन मुख्यतः इंग्रजीमध्ये आढळते.




दुर्गाबाईंच्या मराठी भाषेतील लेखनाचा विचार केल्यास

### 1. अभ्यासपूर्ण लेखन :

यामध्ये दुर्गाबाईंचा 'लोकसाहित्याची रुपरेखा' (1956) हा ग्रंथ आजही लोकसाहित्याच्या अभ्यासकांचा प्रथम संदर्भग्रंथ आहे. मराठीमध्ये लोकसाहित्याचे शास्त्रोक्त पध्दतीने केलेले विवेचन म्हणजे हा ग्रंथ आहे. ''[1] असे स्वतः दुर्गाबाईंनी याच पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. लोकसाहित्याच्या संदर्भात धर्म आणि लोकसाहित्य' (1956) हे याच पठडीतील छोटेसे पुस्तक आहे.

प्रामुख्याने शास्त्रोक्त बैठक असणारी दुर्गाबाईंची ही दोन प्रमुख पुस्तके आहेत. याशिवाय मुळच्या भारतीय लोककथांचे स्वरुपांतर आणि अनुवाद करुन त्यामध्ये, तामिळ लोककथा, बंगालच्या लोककथा, पंजाबी लोककथा, दख्खनच्या लोककथा, काश्मिरच्या लोककथा, उत्तर प्रदेशच्या लोककथा, आसामच्या लोककथा, गुजरातच्या लोककथा, डांगच्या लोककथा, मध्य प्रदेशच्या वनकथा, साष्टीच्या गोष्टी अशी भारतीय लोककथांची एक अखंड मालिकाच दुर्गाबाईंनी सादर केली.

तसेच लोकसाहित्य अभ्यासाच्या निमित्ताने सातपुडयामध्ये फिरत असताना तेथील आदिवासी समाजामध्ये, त्या भागात असलेल्या डोहाविषयीच्या समजुती आणि त्याच्याशी संबंधित एक कथा दुर्गाबाईंनी 'महानदीच्या तीरावर' (1953) या पुस्तकात दिली. अशाच भ्रमंतीदरम्यान बाईंना जी कथाबीजे मिळाली त्यांचा विस्तार करुन 'पूर्वा' (1975) हा कथासंग्रह सिध्द केला. यासंदर्भात दुर्गाबाईंनी, 'या कथा लिहिण्यामागे माझा एक हेतू होता. कॉनन डॉईल, थॉमस मान वगैरे लेखकांनी अनेक ग्रीक व युरोपीय दंतकथा आधाराला घेऊन त्यांच्यावर ललित लेखन केले. व जुन्या कथांकडे पाहण्याचा वाचकांचा दृष्टिकोन बदलला. भारत तर कथांचे माहेरघर, वेदांत, पुराणांत, बोध्द व जैन ग्रंथात अनेक कथांचे कधी न झिजणारे ठसे आहेत. भारतीय संस्कृतीचे कोरडे पुण्यगान करण्यापेक्षा काही प्रसंग, उत्कट व जिवंत क्षण अभ्यासकाला स्वतःच्या आकलनाप्रमाणे चित्रित करणे शक्य आहे. नव्हे ते एक अगत्याचे कर्तव्य आहे.''[2] असे मत मांडले होते. असाच किंबहुना त्याहीपेक्षा वेगळा विचार 'पाली प्रेमकथा' या कथासंग्रहाच्या बाबतीत दुर्गाबाईंनी केला होता. मुळात 'पाली' ही साहित्याची भाषा

नव्हती. ती केवळ बौध्द धर्माच्या सिध्दांताचा प्रचार करण्यासाठी होती. त्यानुसार बौध्द धर्माचे तत्त्वज्ञान, भिक्षुंसाठी आचारसंहिता आणि इतर बौध्दधर्मीय वाड्.मय केवळ पाली भाषेमध्ये आले होते. अशा पार्श्वभूमीवर पाली प्रेमकथेविषयी दुर्गाबाईंनी ''पाली कथाकारांनी फारसे महत्वाचे न मानलेले मानसशास्त्रीय दृष्टिकोन मी जास्त प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.''[3] असे स्पष्टीकरण दिले आहे.

दुर्गाबाईंच्या लोकसाहित्याविषयक या साहित्याबरोबरच ललित साहित्यातही त्यांच्या वेगळेपणाची छटा सतत नाविन्यपूर्ण ठरली.

## 2. ललित साहित्य :

दुर्गाबाईंच्या ललित लेखनाची सुरुवात 'ऋतुचक्र'(1956) मधील लेखांपासून झाली. ऋतुचक्राने वाचकाला निसर्गाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी बहाल केली. निसर्ग कदाचित आपल्या डोळयासमोर असतानाही जाणवला नाही इतका सुंदर तो दुर्गाबाईंच्या ऋतुचक्रामुळे प्रतीत होऊ लागला. असाच अनुभव 'व्यासपर्व' (1962) या महाभारतावरील लेखनाने मिळवून दिला. या पुस्तकाने महाभारतातील काही निवडक पात्रांची अनभिज्ञ बाजू नव्याने वाचकांसमोर मांडली. त्यापैकी काही लेखांसाठी दुर्गाबाईंना विरोधही झाला पण बाई इतकं त्याच विषयावरील कसदार लेखन मात्र अदयापि मराठी साहित्यामध्ये झाले नाही तसेच 'पैस' (1970) या संग्रहामध्येही बाईची लेखणी तितकीच कसदारपणे चालली. याशिवाय 'भावमुद्रा' (1960), 'रुपरंग' (1967), डुब (1975), 'प्रासंगिका' (1975), 'लहानी' (1980), 'आठवले तसे' (1991), 'दुपानी' (1995), 'गोधडी' आणि 'खमंग' (2000) हे बाईंचे इतर ललित लेख संग्रह आहेत.

याशिवाय दुर्गाबाईंनी बाणाच्या संपूर्ण 'कांदबरी' चा मराठीमध्ये अनुवाद केला. बाईंनी हा अनुवाद करण्यापूर्वीही गोविंदशास्त्री, गोडबोलेशास्त्री अशा ब–याच जणांनी कादंबरीची संक्षिप्त भाषांतरे केली मात्र श्लेषप्रचुरता आणि वक्रोक्ती असा संपूर्ण कादंबरीचा दुहेरी अवघड घाट दुर्गाबाईंनी मुळच्या सौंदर्यासह रसिकांपर्यंत पोहचविला. तसेच हेन्री डेव्हिड थोरो यांच्या 'वॉल्डन' या पुस्तकाचा 'वॉल्डनकाठी विचार–विहार' (1965), थोरोच्याच तीन निबंधांचा अनुवाद 'चिंतनिका' (1968) मध्ये दिला आणि ऑगस्ट डर्लेथ यांच्या  ब्वदबवतक त्मइसम । स्पमि वि भ्मिदतल व जेवतमंन चा  'कॉकार्डचा क्रांतिकारक' (1969) असा अनुवाद केला तसेच रविंद्रनाथ टागोरांचे 'लोकसाहित्य' हे पुस्तकही अनुवाद करुन मराठीत आणले (1967) याशिवाय 'टुनटुनीर बई' चे 'लिचकूर कथा' (1965) असे भाषांतर आणि पाली भाषेतील जातकट्ठवण्णना या त्रिपीटकातील एका विभागातील भगवान बुध्दांच्या पुर्वजन्मीच्या 546 कथांपैकी 543 कथांचे भाषांतर करुन त्याचे 'सिध्दार्थ जातक' (1978) नावाचे एकूण सात खंड दुर्गाबाईंनी मराठीमध्ये आणले.

याच 543 कथांपैकी 53 निवडक कथांचा 'बालजातक' (1990) नावाचा संग्रह खास लहान मुलांसाठीही तयार केला. त्या आधीच 'रानझरा' (1963) हा लहान मुलांसाठीचा संग्रह प्रसिध्द होताच याशिवाय प्राणिविषयक स्फुट लेखनामध्ये 'अस्वल' (1982), 'खंडया' (1993), वृक्षविषयक 'कदंब' (1993) असे लेखनही दुर्गाबाईंनी केले.

राजारामशास्त्री भागवत यांच्याशीही दुर्गाबाईंचे कौटुंबिक नात्यापेक्षा दृढ व जवळचे असे वैचारिक नाते होते त्यातूनच राजारामशास्त्री यांचे चरित्र व त्यांच्या साहित्याचे संपादन कार्य बाईंनी सादर केले. तसेच सामाजिक आवर्तनाचे भान ठेवणारी स्वतंत्र वळणाची मराठी कादंबरी निर्माण करण्यातील केतकरांच्या श्रेयाची जाण, यातून 'केतकरी कादंबरी' (1991), 'शासन, साहित्यिक आणि बांधिलकी' (1988) हे वैचारिक ग्रंथही बाईंनी प्रसिध्द केले.

याशिवाय 'भारतीय धातुविद्या' (1995) 'रामकृष्णाचे कोडे' (1988), 'सत्यं, शिवं सुंदरम्' (1978), 'तुळशीचे लग्न' (1975) अशी वैविध्यपूर्ण विचारसंपदा दुर्गाबाईच्या कसदार लेखणीमुळे वाचकांपर्यत आली.

एकूणच दुर्गाबाई भागवंताच्या मराठीतील लेखनाचा विचार करता कोणताही विषय त्यांना वर्ज नव्हता. स्वयंपाक, भरतकाम यामधील सौंदर्य, कला जशी त्यांनी टिपली तेवढयाच रसिकतेने त्यांनी लोकसाहित्य, ललित साहित्याचा अभ्यास केला आणि तो मांडला पण तो मांडताना, ''माझ्या लेखनाला मी ध्येयस्वरुप मानीत नाही. प्रकृतिधर्म मानते. आवड मानते, छंद मानते नि कर्तव्य मानते.''[4] असे दुर्गाबाईंचे म्हणणे होते.

याप्रकारे लेखनाला जसे बाईंनी कर्तव्य मानले तसेच 1975 मध्ये कराड येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन आणीबाणीविरोधी भूमिका घेऊन एक सामान्य व्यक्ती आणि त्याचबरोबर लेखिका म्हणून आपली मते ठामपणे मांडून आपला हक्कच जणू त्यांनी बजावला. ही सरकारविरोधी भूमिका आणीबाणी संपल्यावरही सरकारकडून मिळणारे सर्व पुरस्कार नाकारुन त्यांनी अखेरपर्यत पार पाडली.

अशी ही मराठी साहित्यातील विद्युल्लता 7 मे 2002 मध्ये वयाच्या 92 व्या वर्षी लोप पावली.

## संदर्भग्रंथ सूची :

1. भागवत, दुर्गा – लोकसाहित्याची रुपरेखा पृ. 9 वरदा प्रकाशन, पुणे–1977
2. भागवत, दुर्गा – पूर्वा प्रस्तावना, पृ. 6, 7 डिंपल पब्लिकेशन, मुंबई 1998
3. भागवत, दुर्गा – पाली प्रेमकथा प्रस्ता. पृ. 4 वरदा प्रकाशन, पुणे 1992
4. भागवत, दुर्गा – डूब, पृ. 82,83 ग्रंथाली प्रकाशन, मुंबई 1975



प्राची अर्जुन शेकटकर

